सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे

# महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत नियम, १९६४

(सुधारित)

महिला व बाल विकास आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे

# महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत नियम, १९६४

(सुधारित)

एच के ४११५-१

# महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत नियम, १९६४

(सन १९८५ पर्यंत सुधारित)

शासकीय अधिसूचना, संवायोजन व समाजकल्याण विभाग क्रमांक आयएनटी. ४४५९-एन, दिनांक ४ मे १९६४ (महाराष्ट्र राजपत्र भाग चार-ब, पृष्ठ ४८८) मुंबईच्या भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९ च्या कलम ३५ (२) (१९६० चा मुंबई दहा) कलम ३५ च्या पोट-कलम (२) चे खंड (अ) ते (ई) आणि (ग) ते (न) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत असून, हे नियम, उक्त कलम ३५ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले आहेत :—

## नियम

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना, महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत नियम, १९६४ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, मुंबईच्या भीक मागण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९५९ (१९६० चा मुंबई १०) असा आहे ;

(ख) " नमुना " याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना, असा आहे ;

(ग) " कलम " याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे ;

३. **कलम २ (१) (एक) द्वारे प्रयोजन अधिकृत करण्यासाठी व्यवस्थापक.**—(१) कोणत्याही प्रयोजनासाठी, पैसे, अन्न किंवा देणग्या मागण्याची किंवा घेण्याची इच्छा असलेली व्यक्ती, प्रयोजन अधिकृत करून घेण्यासाठी—

(एक) बृहन्मुंबईमध्ये, पोलीस आयुक्तांकडे; आणि

(दोन) अन्यत्र, जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे, किंवा

(तीन) राज्याच्या अन्य कोणत्याही भागामध्ये, राज्य शासनाकडे अर्ज करील.

(२) अर्जामध्ये पुढील तपशील अंतर्भूत असेल :-

(क) अर्जदाराचे संपूर्ण नाव

(ख) वय

(ग) धंदा

(घ) पत्ता

(ड) पैसे, अन्न किंवा देणग्या गोळा करण्याचा कालावधी, प्रयोजन व रीत

(च) त्याच्या विनियोगाची पद्धत व ज्या क्षेत्रात विनियोग केला जाणार आहे ते क्षेत्र.

(३) पोलीस आयुक्त किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकारी, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, ज्या प्रयोजनासाठी पैसा, अन्न किंवा देणग्या गोळा करण्यात येणार आहे ते हे प्रयोजन लक्षात घेऊन, त्याला योग्य वाटतील अशा आणखी शर्ती लादण्याच्या अधीन राहून, नमुना 'क' मधील प्राधिकारपत्र देईल.

(४) प्राधिकारपत्रधारक हा, पैसे, अन्न किंवा देणग्या मागताना किंवा घेताना ते प्राधिकारपत्र स्वत:बरोबर ठेवील आणि एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने, त्याची मागणी केल्यावर तपासणीसाठी ते सादर करील.

(५) कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास, प्राधिकारपत्र रद्द होण्यास पात्र असेल.

(६) अर्जदारास प्राधिकारपत्र देण्यात येऊ नये असे पोलीस आयुक्तांचे किंवा, यथास्थिति, जिल्हा दंडाधिकाऱ्यांचे मत असेल तर, तो त्याबाबतची त्याची कारणे नोंदवील, आणि अर्जदाराला प्राधिकारपत्र नाकारण्यात आल्याबाबत, शक्य तितक्या लवकर कळवील.

(७) पोट-नियम (६) द्वारे जरी असे प्राधिकारपत्र नाकारण्यात आलेले असले तरी शासनाला कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही ठिकाणाच्या किंवा क्षेत्राच्या संबंधात प्राधिकारपत्र देता येईल.

(८) पोट-नियम (३) व (७) यांद्वारे दिलेल्या प्राधिकारपत्राबाबत, संबंधित मुख्य निरीक्षक व अधीक्षक यांना यथोचित रीत्या कळविण्यात येईल.

४. **कलम ४(१) च्या प्रयोजनासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्ती.**—प्रत्येक अधीक्षक हा, कलम ४च्या प्रयोजनांसाठी प्राधिकृत केलेली व्यक्ती असेल.

५. **कलम ४(३) किंवा कलम ९(३) अन्वये, अटक केलेल्या व्यक्तीस ठेवण्याची पद्धत.**—(१) पोट-नियम (२) च्या तरतुदींना अधीन राहून पोलीस ठाण्याचा किंवा क्षेत्राचा प्रभारी अधिकारी, अटक केलेल्या व्यक्तीला न्यायालयासमोर हजर करेपर्यंत, कलम ४ किंवा कलम ९ अन्वये तिला जवळच्या आदान केंद्रात किंवा पोलीस ठाण्यात ठेवण्याची व्यवस्था करील अशा व्यक्तीला तो पोलीस ठाण्याच्या ताब्यात असताना, शक्य असेल तेथवर, त्यांच्या ताब्यातील इतर व्यक्तींपासून वेगळे ठेवण्यात येईल :

परंतु, अशा व्यक्तीला, या पोट-नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, या पोट-नियमानुसार पोलीस ठाण्यात ठेवलेल्या इतर व्यक्तींपासून वेगळे ठेवण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) पोट-नियम (१) अनुसार कोणत्याही व्यक्तीला, भिन्न लिंगी व्यक्तीबरोबर ठेवण्यात येणार नाही :

परंतु या पोट-नियमातील कोणतीही गोष्ट बारा वर्षांखालील वयाच्या मुलाला लागू होणार नाही.

६. **कलम ५(१) अन्वये, संक्षिप्त चौकशी करण्याची रीत.**—कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये चौकशी करण्यासाठी, शक्यतोवर, समन्स प्रकरणांची चौकशी करण्यासाठी व त्यामधील पुरावे नोंदविण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ मध्ये विहित केलेली प्रक्रिया अनुसरण्यात येईल.

७. **कलम ८ (१) अन्वये आईबाप किंवा इतर व्यक्ती यांनी खर्चाबाबत रकमा देणे.**—(१) कलम ८ च्या पोट-कलम (१) अन्वये आदेश देणाऱ्या न्यायालयास, प्रमाणित संस्थेमध्ये स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीला पोसण्यासाठी जबाबदार असलेल्या आईबापांना किंवा इतर व्यक्तीला, अशा व्यक्तीला पोसण्यासाठी, न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे, दर महिना ३० रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी रक्कम, प्रत्येक महिन्याच्या सुरुवातीला न्यायालयात आगाऊ भरण्याकरिता निदेश देता येईल.

(२) न्यायालये पोट-नियम (१) अन्वये त्यांच्याकडे प्रदान करण्यात आलेल्या सर्व रकमा शासनाच्या संकीर्ण जमा रकमा म्हणून शासकीय कोषागारात जमा करतील.

८. **आदान केंद्रामध्ये किंवा प्रमाणित संस्थेमध्ये परत पाठविलेल्या किंवा स्थानबद्ध केलेल्या व्यक्तींची स्वच्छता व वैद्यकीय तपासणी.**—(१) आदान केंद्रामध्ये किंवा प्रमाणित संस्थेमध्ये परत पाठविलेल्या किंवा स्थानबद्ध केलेल्या प्रत्येक व्यक्ती.—

(क) (एक) प्राथमिक वैद्यकीय तपासणी व वैद्यकीय अधिकाऱ्याच्या मते आवश्यक असतील असे वैद्यकीय प्रथमोपचार करून घ्यावे लागतील ;

(दोन) लिंगी वैद्यकीय तपासणी करण्यासाठी किंवा स्वच्छता व आरोग्य चांगले राखण्यासाठी, अधीक्षक किंवा वैद्यकीय अधिकारी यांच्या मते आवश्यक असेल त्याप्रमाणे अंगावरील केस कापून घ्यावे लागतील किंवा दाढी करावी लागेल ;

(तीन) शरीराची पूर्ण साफसफाई करण्यासाठी व अंघोळ करण्यासाठी व अंगावरचे सर्व कपडे उतरावे लागतील आणि पुरविण्यात येईल अशा साहित्याने अशी साफसफाई व अंघोळ करावी लागेल.

(ख) अधीक्षक निदेश देईल असे कपडे घालावे लागतील.

(२) (क) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी कलम २६ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीअनुसार जो वैद्यकीय अधिकारी कलम २५ अन्वये आदान केंद्रात ठेवून घेतलेल्या एखाद्या व्यक्तीची तपासणी करील तो अशा व्यक्तीच्या संपूर्ण शरिराची काळजीपूर्वक व संपूर्णपणे तपासणी करील आणि

(एक) जर त्या व्यक्तीचे आरोग्य चांगले असेल तर, नमुना 'ख' मध्ये व त्या व्यक्तीचे आरोग्य चांगले नसेल तर, नमुना 'ग' मध्ये त्याच्या तपासणीच्या निष्कर्षांची नोंद करील,

(दोन) संबंधित व्यक्तीच्या पूर्ववृत्तामध्ये अशा नोंदीची एक प्रत ठेवील,

(तीन) त्याच्या तपासणीबाबतचे निष्कर्ष अधीक्षकाला कळवील :

परंतु, महिलेची तपासणी आदान केंद्रातील महिला कक्षामध्ये व शक्य असेल तेथवर एखाद्या महिला वैद्यकीय अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(ख) कलम २६ ची पोट-कलमे (१), (२) व (३) यांअन्वये राज्य शासनाचे किंवा उक्त पोट-कलम (३) च्या परंतुकान्वये न्यायालयाचे आदेश होईपर्यंत वैद्यकीय अधिकारी सांसर्गिक कुष्ठरोगी किंवा वेडा असल्याचे आढळून आलेल्या व्यक्तींवर, कोणतेही तात्काळ वैद्यकीय उपचार, आदान केंद्रात करण्याची व्यवस्था करील.

(३) या नियमांच्या कोणत्याही तरतुदींना बाध न आणता, पोट-नियम (१) किंवा (२) च्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींचे पालन करण्याच्या दृष्टीने आवश्यक असेल तेवढ्या किमान प्रत्यक्ष मनुष्यबळाचा वापर करण्यात येईल.

९. **न्यायालयाने परत पाठविलेल्या व्यक्ती व आदान केंद्रांमध्ये स्थानबद्ध असलेल्या व्यक्ती यांना वेगळे ठेवणे.—**न्यायालयाने परत पाठवल्यावर आदान केंद्रामध्ये दाखल करून घेतलेल्या व्यक्तीला या आदान केंद्रामध्ये स्थानबद्धतेची शिक्षा भोगत असलेल्या व्यक्तींपासून वेगळे ठेवण्यात येईल आणि त्याच्या खटल्याच्या सुनावणीसंबंधात त्याला सर्व खाजगी सुविधा पुरविण्यात येतील.

१०. **आदान केंद्रामध्ये व प्रमाणित संस्थांमध्ये आलेल्या व्यक्तींना तेथील इतर सहनिवासी व्यक्तींपासून वेगळे ठेवणे.—**आदान केंद्रामध्ये किंवा प्रमाणित संस्थेमध्ये दाखल करून घेतलेल्या व्यक्तीच्या वैद्यकीय अहवालावरून तिला तेथील इतर व्यक्तींपासून वेगळे ठेवण्याची आवश्यकता नाही, अशी अधीक्षकाची खात्री पटली नाही तर, प्रत्येक अशा व्यक्तीला, अशा केंद्रामधील किंवा संस्थेमधील इतर व्यक्तींपासून वेगळे ठेवण्यात येईल.

११. **झडती घेतल्यावर व तपासणी केल्यावर सापडलेल्या वस्तूंची नोंदवहीमध्ये नोंदघेणे.—**(१) अधीक्षक, प्रत्येक आदान केंद्रामध्ये किंवा प्रमाणित संस्थेमध्ये, तेथे दाखल करून घेतलेल्या व्यक्तीकडे किंवा तिच्या अंगावर सापडलेले पैसे, मौल्यवान वस्तू किंवा चीजवस्तू कोणत्याही असल्यास, यांची नोंद करण्यासाठी एक नोंदवही ठेवील.

(२) अशा केंद्रामध्ये किंवा संस्थेमध्ये एखाद्या व्यक्तीला दाखल करून घेतल्यावर, कलम १८ अन्वये तिची झडती घेतल्यावर व तपासणी केल्यानंतर, तिच्याकडे किंवा तिच्या अंगावर सापडलेल्या व ताब्यात घेतलेल्या पैशांची मौल्यवान वस्तूंची किंवा चीजवस्तूंची, कोणत्याही असल्यास, अशा नोंदवहीमध्ये नोंद करण्यात येईल व नोंदवहीमधील या नोंदी तिला वाचून दाखविण्यात येतील आणि त्या नोंदी अचूक असल्याचा पुरावा म्हणून, अधीक्षकाच्या समोर त्याची सही घेण्यात येईल.

(३) अशा नोंदवहीतील सर्व नोंदी, अधीक्षकाकडून प्रमाणित करण्यात येतील.

१२. **कलम १८ अनुसार मालमत्तेची विल्हेवाट लावणे.—**एखाद्या आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत दाखल करून घेतलेल्या किंवा स्थानबद्ध केलेल्या, परंतु जी नियम ५ अन्वये अशा केंद्रामध्ये ठेवलेली व्यक्ती नाही अशा व्यक्तीच्या मालकीचे असलेले पैसे किंवा मौल्यवान वस्तू यांव्यतिरिक्त असलेल्या चीजवस्तूंची पुढील रीतीने विल्हेवाट लावण्यात येईल:—

(क) जर यामध्ये, अश्लील चित्रे किंवा साहित्य, तंबाखू, तपकीर, अफू, कोणतेही अंमली द्रव्य किंवा मद्य किंवा क्षुल्लक किमतीच्या नाशिवंत वस्तू यांचा अंतर्भाव असेल तर त्या वस्तूंची विल्हेवाट लावण्यात येईल ;

(ख) जर यामध्ये, क्षुल्लक किमतीपेक्षा अधिक किंमत असलेल्या नाशिवंत वस्तूंचा अंतर्भाव असेल तर, त्या वस्तूंची शक्य तितक्या लवकर, लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल आणि मिळणारे हे उत्पन्न अधीक्षक सुरक्षित अभिरक्षेत ठेवील ;

(ग) जर अधीक्षकाला, अशा व्यक्तीचे कपडे, अंथरुण-पांघरुण किंवा इतर वस्तू या आरोग्याच्या दृष्टीने नष्ट करणे आवश्यक वाटत असेल किंवा त्या कुचकामी असल्याचे वाटत असेल किंवा त्याचे कपडे या अंथरुण-पांघरुण अतिशय जीर्णशीर्ण झाले असेल तर, अशा वस्तूंची विल्हेवाट लावण्यात येईल ; किंवा ते कपडे, अंथरुण-पांघरुण व इतर वस्तू या कोणत्याही सांसर्गिक किंवा संक्रामक रोग झालेल्या व्यक्तिच्या असल्याचे आढळून आले तर जाळण्यात येतील ;

(घ) खंड (क), (ख) व (ग) च्या तरतुदींमध्ये, अंतर्भाव होत नसलेले कपडे, अंथरुण-पांघरुण व इतर वस्तू या धुवून व आवश्यक वाटल्यास जंतु विरहित करून नंतर त्यांचे गाठोडे किंवा गाठोडी बांधून त्या योग्य रीतीने जमा करून ठेवण्यात येतील. त्यांच्या वस्तू सुरक्षित अभिरक्षेसाठी अधीक्षक जबाबदार असेल.

१३. **न्यायालयाने कलम १८ अन्वये आदेश मंजूर केल्यानंतर, मालमत्तेची विल्हेवाट लावणे.**—जेव्हा न्यायालयाने, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध स्थानबद्धतेचा आदेश काढला असेल तेव्हा—

(क) अधीक्षकाला, अशा व्यक्तीकडे किंवा त्यांच्या अंगावर सापडलेले पैसे व मौल्यवान वस्तू सुरक्षित ताब्यात ठेवण्याचा आणि त्यांच्या मुक्ततेच्या वेळी त्यांच्याकडे सुपूर्द करण्याचा आदेश देता येईल.

(ख) अशा व्यक्तीच्या मालकीचे असलेले कोणतेही पैसे किंवा मौल्यवान वस्तू, त्या व्यक्तीच्या संमतीने व अधीक्षकाच्या मान्यतेने, त्याच्या स्थानबद्धतेच्या कालावधीत केव्हाही, त्याच्या मित्रांकडे किंवा नातेवाईकांकडे सुपूर्द करता येतील ; किंवा त्या वस्तू विकता येतील आणि विक्रीतून आलेल्या उत्पन्नाचा त्या व्यक्तीच्या इच्छेनुसार असलेल्या रीतीने विनियोग करता येईल.

(ग) अशा व्यक्तीच्या मुक्ततेच्या वेळी, सुरक्षित ताब्यात ठेवलेल्या चीजवस्तू, मौल्यवान वस्तू किंवा पैसे त्याच्याकडे सुपूर्द करण्यात येतील आणि नियम ११ (२) अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत त्याबाबतची नोंद करण्यात येईल. या नोंदीवर, अधीक्षक सही करील.

१४. **कर्मचारीवर्गाने लिलावात काढलेल्या वस्तूंची खरेदी न करणे.**—आदान केंद्राच्या किंवा प्रमाणित संस्थेच्या कर्मचारीवर्गातील कोणतीही व्यक्ती, या नियमांन्वये, कोणत्याही मालमत्तेच्या लिलावात, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, बोली बोलणार नाही किंवा लिलावात काढलेल्या कोणत्याही मालमत्तेची खरेदी करणार नाही.

१५. **प्रमाणित संस्थेतील किंवा आदान केंद्रातील स्थानबद्ध व्यक्तिना विवक्षित कृती करण्यास मनाई.**—कलम १९ अन्वये, प्रमाणित संस्थेत किंवा आदान केंद्रात परत पाठविलेली किंवा स्थानबद्ध केलेली व्यक्ती.—

(एक) तिच्यासाठी आयोजित केलेले किंवा तिने घ्यावे म्हणून आदेश दिलेले कोणतेही प्रशिक्षण किंवा त्याला नेमुन दिलेले काम नाकारणार नाही ;

(दोन) विविध उद्योगांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना माहिती न देता किंवा त्यांची परवानगी न घेता कोणत्याही वस्तुंचे उत्पादन करणार नाही ;

(तीन) इतर कोणत्याही सहनिवासी व्यक्तीशी गैरवर्तणूक किंवा भांडण करणार नाही ;

(चार) शिस्तीचे पालन करण्याच्याकामी मदत करण्यात हयगय करणार नाही किंवा एखाद्या अधिकाऱ्याने मदत करण्यास, फर्मावले असताना त्याला मदत करण्यास टाळाटाळ करणार नाही ;

(पाच) तो स्वत: आजारी पडेल, त्याला स्वत:ला दुखापत होईल किंवा अपंगत्व आणिल अशा उद्देशाने कोणतीही कृती करणार नाही किंवा अशी कोणतीही कृती करण्याचे टाळील ;

(सहा) त्याच्या हालचालीबाबत वस्तुस्थिती सांगताना कोणत्याही प्रश्नाचे खरे उत्तर देणार नाही किंवा खरी माहिती देण्यास नकार देणार नाही ;

(सात) कोणत्याही प्रकारे अशांतता किंवा हिंसाचार माजविणार नाही किंवा कोणतीही अशांतता नाहिशी करण्याच्या कामी मदत करण्यात नकार देणार नाही ;

(आठ) निवासी व्यक्तीच्या भावनांना व पुर्वग्रहांना धक्का पोहोचावा किंवा त्यांची मने दुखावली जातील या हेतुने जाणीवपूर्वक कोणतेही काम किंवा अशा कोणत्याही भाषेचा वापर करणार नाही ;

(नऊ) संस्थेच्या किंवा केंद्राच्या कोणत्याही भागात उपद्रव निर्माण करणार नाही किंवा कोणतेही असभ्य कृत्य करणार नाही किंवा योग्य ती स्वच्छता ठेवण्यासाठी दिलेल्या कोणत्याही आदेशांचे पालन करण्यास नकार देणार नाही ;

(दहा) त्याचे स्वत:चे कपडे, अंथरुण-पांघरुण, भांडी किंवा इतर कोणत्याही वस्तू यांची स्वच्छता ठेवण्यासंबंधात नियमन करणाऱ्या कोणत्याही आदेशाचा भंग करणार नाही ;

(अकरा) इतर कोणत्याही सहनिवासी व्यक्तीची अथवा संस्थेमधील किंवा केंद्राधील कोणतीही वस्तू लपवून ठेवणार नाही किंवा इतर कोणत्याही सहनिवासी व्यक्तिच्या साहित्याच्या कोणत्याही भागाचे अथवा संस्थेच्या किंवा केंद्राच्या कोणत्याही मालमत्तेचे किंवा उपकरणांचे नुकसान करणार नाही ;

(बारा) आहाराच्या प्रमाणानुसार विहित केलेले अन्न खाण्यास योग्य सबबी शिवाय नकार देणार नाही किंवा कोणत्याही अन्नाचा जाणूनबुजून नाश करणार नाही किंवा ते अरुचिकर किंवा अपथ्यकर करणार नाही ;

(तेरा) जिच्याकडे तिला कामावर लावण्यात आले आहे त्या व्यक्तीला किंवा एखाद्या विशिष्ट वेळी तिने जेथे उपस्थित राहणे आवश्यक असेल अशी जागा किंवा मैदान परवानगी न घेता सोडणार नाही ;

(चौदा) ती नियम १६ मध्ये नमूद केलेल्या, मनाई असलेल्या कोणत्याही वस्तू स्वीकारणार नाही, बाळगणार नाही किंवा त्यात वाटेकरी होणार नाही ;

(पंधरा) एखाद्या अधिकाऱ्याला त्याचे कर्तव्य बजावण्यास प्रतिकार करणार नाही किंवा त्यात अडथळा निर्माण करता येणार नाही किंवा एखाद्या अधिकाऱ्याने दिलेला कोणताही कायदेशीर आदेश पाळण्याचे नाकारणार नाही किंवा तो आदेश पाळण्यात हयगय करणार नाही किंवा कामे किंवा कर्तव्ये करण्यासाठी नेमून देण्यात आलेल्या रीतीने कामे किंवा कर्तव्यं करण्याचे नाकारणार नाही किंवा त्यात हयगय करणार नाही.

१६. **मनाई केलेल्या वस्तू.—**(१) अधीक्षक किंवा वैद्यकीय अधिकारी यांच्या परवानगीशिवाय, कोणत्याही व्यक्तिला मनाई करण्यात आलेली एखादी वस्तू आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत घेऊन जाता येणार नाही.

(२) मनाई करण्यात आलेल्या वस्तू पुढीलप्रमाणे :—

(एक) कोणत्याही प्रकारचे अल्कोहोल व स्पिरिट

(दोन) भांग, गांजा व अफू

(तीन) कोणत्याही प्रकारची अंमली द्रव्ये

(चार) आग निर्माण करणाऱ्या आगकाड्या व इतर सामग्री

(पाच) जुगार खेळण्यासाठी लागणारी साधने

(सहा) ज्यामुळे दुखापत करता येईल किंवा ज्याचा वापर करून स्वत:ची सुटका करून घेता येईल अशी कोणत्याही प्रकारची (हत्यारे) साधने

(सात) विशेष आदेशाद्वारे अधीक्षकाने याबाबतीत विनिर्दिष्ट केल्या असतील अशा इतर कोणत्याही वस्तू.

१७. **कल्याण निधी.—** (१) प्रत्येक आदान केंद्र व प्रमाणित संस्था यांच्याकरिता एक कल्याण निधी ठेवला जाईल.

(२) अधीक्षकास लोकांनी कल्याण निधीसाठी रोख रकमेच्या स्वरुपात किंवा कोणत्याही प्रकारे दिलेल्या देणग्या किंवा वर्गण्या स्वीकारता येतील:

परंतु, १ हजार रुपयांहून अधिक रोख रकमेतील कोणतीही देणगी किंवा वर्गणी राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय स्वीकारता येणार नाही.

(३) या नियमाखाली स्वीकारण्यात आलेल्या सर्व देणग्या व वर्गण्यांच्या अनुक्रमांक असलेल्या लेखी पावत्यांद्वारे पोच देण्यात येईल.

(४) (क) अधीक्षक, कल्याण निधीसाठी देण्यात आलेल्या देणग्या किंवा वर्गण्या यांची रक्कम, आपल्या नावाचे वैयक्तिक खाते उघडून नजीकच्या शासकीय कोषागारात जमा करील.

(ख) अधीक्षक, सर्व बिगर शासकीय पैसा, प्रत्येक सहनिवासी व्यक्तीसाठी वैयक्तिक खाते उघडून नजीकच्या शासकीय कोषागारात जमा करील. असा बिगर शासकीय पैसा कल्याण निधीचा भाग असणार नाहीत.

**स्पष्टीकरण.**—या पोट-नियमाच्या प्रयोजनार्थ, बिगर शासकीय पैसा याचा अर्थ,—

(क) चांगले वर्तन व प्रशिक्षणातील समाधानकारक प्रगती यांसाठी नियम २७, पोट नियम (३) खाली सहनिवासी व्यक्तिंनी कमावलेली उपदानाची रक्कम ;

(ख) बाहेरील कामे करून सहनिवासी व्यक्तींनी कमावलेले वेतन ;

(ग) अधीक्षकाकडे जमा करण्यात आलेली सहनिवासी व्यक्तींची खाजगी रोख रक्कम ;

—असा आहे.

(५) कल्याण निधीमध्ये जमा असलेली रक्कम खालील कारणांसाठी खर्च करता येईल, ती कारणे अशी :—

(एक) निधी जमा करण्याच्या संबंधातील आकस्मिक खर्च भागवणे ;

(दोन) केंद्र किंवा यथास्थिति, संस्थेतून लायसनवर सुटका करण्यात आलेल्या सहनिवासी व्यक्तिसह (भिकारी) सहनिवासी व्यक्तिच्या कल्याणाची व त्यांना सुखसोई पुरवण्याची तरतूद करणे.

(६) अधीक्षकास निरीक्षक समितीशी विचारविनिमय करून पोट-नियम (५) च्या आवश्यकतांच्या अधीनतेने निरीक्षक समितीने पूर्वीच निश्चित केलेल्या वस्तूवर कल्याण निधीतील रक्कम खर्च करता येईल.

परंतु, शंभर रुपयांहून अधिक असेल अशी कोणतीही रक्कम मुख्य निरीक्षकाची पूर्व मंजुरी घेतल्याखेरीज खर्च करता योणार नाही.

(७) नियंत्रण व वितरण अधिकारी म्हणून अधीक्षकास निधी चालविता येईल आणि तो, निधीतील रकमेचा यथायोग्य लेखा ठेवण्यासाठी जबाबदार असेल.

(८) अधीक्षक, निधीच्या संबंधात स्वतंत्र रोकड वही व मागणी पुस्तक ठेवील.

(९) निधीच्या लेख्यांचे ते ज्याच्याशी संबंधित असतील अशा आदान केंद्राच्या किंवा प्रमाणित संस्थेच्या वार्षिक लेखा परीक्षेच्यावेळी लेखा परीक्षण करण्यात येईल.

१८. **दान पेटया**—(१) अधीक्षकास दान पेटया बसविता येतील आणि पोट-नियम (२) च्या तरतुदीच्या अधीनतेने, त्या कुलूपबंद व सीलबंद ठेवण्यात येतील.

(२) अशी प्रत्येक पेटी, दर महिन्यात आठवड्यातून किमान एकदा व जास्तीत जास्त दोनदा उघडता येईल.

(३) अशा रीतीने जमा करण्यात आलेली रक्कम चलनाद्वारे शासकीय कोषागारामध्ये जमा करण्यात येईल आणि ती नियम १७ च्या पोट-नियम (५) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रीतीने व विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रयोजनांसाठी खर्च करण्यात येईल.

१९. **निरीक्षक समिती.**—(१) कलम १४ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निरीक्षक समितीमध्ये दहा सदस्यांचा समावेश असेलल्या दहा सदस्यांपैकी अध्यक्षासह पाच सदस्य हे शासकीय अधिकारी असतील तर पाच सदस्य हे अशासकीय असतील.

(२) अधीक्षक व याबाबतीत वेळोवेळी नियुक्त करण्यात आलेल्या अध्यक्षासह राज्य शासनाचे अन्य चार अधिकारी हे पदसिद्ध सदस्य असतील. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत उपस्थित असलेल्या ज्येष्ठतम शासकीय सदस्य अध्यक्ष म्हणून काम करील.

(३) महिला भिकाऱ्यांसाठी असलेल्या आदान केंद्र किंवा प्रमाणित संस्था याकरिता स्थापन करण्यात आलेल्या निरीक्षक समितीच्या बाबतीत, राज्य शासनाकडून अशासकीय सदस्य नामनिर्देशित करण्यात येतील आणि त्यांपैकी किमान दोन महिला सदस्य असतील.

(४) अशासकीय सदस्य, त्यांना नियुक्त करण्यात आल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीसाठी किंवा याबाबतीत राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशा आणखी कालावधीसाठी पद धारण करील.

(५) राज्य शासनास, एखाद्या अशासकीय सदस्याच्या नियुक्तीचा कालावधी, कोणतेही कारण न देता, कोणत्याही वेळी समाप्त करता येईल.

(६) अशासकीय सदस्य, त्याचा पदावधी समाप्त झाल्यावर पुन्हा नामनिर्देशन होण्यास पात्र असेल.

(७) अशासकीय सदस्यांमधील कोणतेही नैमित्तिक रिक्त पद हे दुसऱ्या अशासकीय सदस्यास नामनिर्देशित करून भरण्यात येईल व तो सदस्य, ज्या व्यक्तीच्या जागेवर नामनिर्देशित करण्यात आला आहे त्या व्यक्तीने, असे पद रिक्त झाले नसते तर जितक्या कालावधीकरिता ते पद धारण केले असते तितक्या कालावधीसाठी ते पद धारण करील.

२०. **निरीक्षक समितीची कर्तव्ये.**— (१) पुढील गोष्टी करणे हे, राज्य शासनाद्वारे चालवण्यात येणाऱ्या आदान केंद्र किंवा प्रमाणित संस्था यांच्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या निरीक्षक समितीवरील सदस्यांचे कर्तव्य असेल :—

(क) अध्यक्षाने सदस्यांशी विचारविनिमय केल्यावर जी नामावली तयार केली असेल त्यानुसार महिन्यातून एकदा केंद्र किंवा यथास्थित ती संस्थेची पाहणी करणे ;

(ख) बैठकींना उपस्थित राहणे ;

(ग) केंद्र किंवा संस्थेच्या सर्व भागांची पाहणी करणे आणि त्याठिकाणी परत ठेवण्यात आलेल्या किंवा स्थानबद्ध करण्यात आलेल्या प्रत्येक सहनिवासी व्यक्ती भेटणे आणि त्याला योग्य वाटेल अशा रीतीने त्यांची चौकशी करणे ;

(२) अशा निरीक्षक समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) शिस्त पालन सेवायोजन (नोकऱ्या), औद्योगिक शिक्षण देणे व वैद्यकीय देखभाल करणे यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत, याबद्दल स्वत:ची खात्री करून घेणे ;

(ख) प्रत्येक सहनिवासी व्यक्तीस अर्ज करण्याची संधी देणे आणि त्याबाबतीत लक्ष घालणे ;

(ग) लेखे व अन्य नोंदवह्या आणि सहनिवासी व्यक्तींविषयीच्या नोंदी यांची पाहणी करणे ;

(घ) प्रमाणित संस्थेमध्ये स्थानबद्ध केलेल्या व्यक्तींना कलम २१ अनुसार लायसनवर सोडण्यासाठी मुख्य निरीक्षक किंवा अधीक्षक यांच्याकडे शिफारस करणे ;

(ङ) अशा रीतीने सोडण्यात आलेल्या व्यक्तींचा ताबा घेण्यास किंवा त्यांना काम देण्यास इच्छुक असणाऱ्या संस्था किंवा जबाबदार व्यक्तींच्या नावांची मुख्य निरीक्षकाकडे शिफारस करणे ;

(च) सोडून देण्याची शिफारस करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही संस्थेच्या किंवा जबाबदार व्यक्तीच्या ताब्यात राहण्यास किंवा त्यांच्यासाठी काम करण्यास इच्छुक आहे किंवा कसे याची खात्री करून व त्याची माहिती मुख्य निरीक्षकास कळविणे ;

(छ) केंद्र किंवा यथास्थिति, संस्था यांची प्रगती आणि एकंदरीतच सहनिवासी व्यक्तींचे कल्याण यांच्याशी संबंधित अन्य कोणतीही बाब यांवर विचार करणे.

(३) चार सदस्य मिळून पोट-नियम (१) याच्या खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या बैठकीसाठीची गणपूर्ती होईल.

२१. **राज्य शासनाद्वारे चालविण्यात न येणाऱ्या आदान केंद्रासाठी व प्रमाणित संस्थेसाठी निरीक्षक समिती.**—राज्य शासनाद्वारे चालविण्यात न येणारे आदान केंद्र व प्रमाणित संस्था यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या निरीक्षक समितीची कर्तव्ये ही, राज्य शासनाने त्यासंबंधात केलेल्या कोणत्याही करारातील शर्तींना अधीन राहून, नियम २० द्वारे विहित करण्यात आलेल्या कर्तव्यांसारखीच असतील.

२२. **निरीक्षक समिती पुस्तक.**—(१) आदान केंद्र व प्रमाणित संस्था यांमध्ये, साधारण अभ्यागत नोंदवही खेरीज, एक स्वतंत्र निरीक्षक समिती नोंद वही ठेवण्यात येईल, त्यामध्ये समितीच्या प्रत्येक बैठकीत करण्यात आलेल्या कामकाजाच्या कार्यवृत्ताची नोंद करण्यात येईल आणि त्यात निरीक्षक समितीचे सदस्य त्यांनी दिलेल्या भेटींचे दिनांक आणि त्यांना द्यावे वाटतील अशा शेऱ्यांची व सूचनांचीदेखील त्यात नोंद करतील.

(२) प्रत्येक बैठकीत चालणाऱ्या कामकाजाची एक प्रत आणि असे सर्व शेरे, अधीक्षकाला त्यावर जे शेरे देण्याची इच्छा असेल अशा शेऱ्यांसह, मुख्य निरीक्षकाकडे पाठविण्यात येतील.

२३. **स्थानिक प्राधिकरणाने ज्या दिनांकापूर्वी वर्गणी प्रदान करावयाची तो दिनांक.**—ज्या स्थानिक प्राधिकरणाने कलम १६, पोट-कलम (१) अन्वये कोणतीही रक्कम प्रदान करण्याचे मान्य केले असेल असे प्राधिकरण अशी रक्कम ज्या वित्तीय वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या लगतनंतरच्या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिनांकापूर्वी राज्य शासनाला प्रदान करील.

२४. **एका आदान केंद्रातून किंवा प्रमाणित संस्थेतून दुसऱ्या आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत हलवण्याबाबतच्या शर्ती.**—(१) पुढील शर्तींना अधीन राहून एका आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत स्थानबद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्यातील दुसऱ्या आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत हलवण्याचा निदेश मुख्य निरीक्षक पोट-नियम (२) च्या तरतुदींना अधीन राहून देऊ शकेल. त्या शर्ती पुढीलप्रमाणे :—

(एक) असा प्रत्येक निदेश जागेची उपलब्धता ध्यानात घेऊन देण्यात येईल ;

(दोन) असा कोणताही निदेश,—

(क) वैद्यकीय किंवा आरोग्यविषयक कारणांवरून अशा व्यक्तीला हलविण्याची शिफारस करणारा वैद्यकीय अधिकाऱ्याचा अहवाल सादर करण्यात आला असेल त्याव्यतिरिक्त किंवा

(ख) न्यायालयाने निदेश दिला असेल त्याव्यतिरिक्त, किंवा

(ग) शिस्तीच्या किंवा अन्य कारणास्तव अशा व्यक्तीला हलविण्याची शिफारस करणारा अहवाल अधीक्षकाने दिला असेल त्याव्यतिरिक्त ;

—देता येणार नाही.

(२) एका आदान केंद्रातून किंवा प्रमाणित संस्थेतून दुसऱ्या केंद्रात किंवा संस्थेत अशा व्यक्तीला हलविण्यात आले असेल त्याबाबतीत, त्याच्यासोबत अधीक्षकाच्या ताब्यात असलेल्या त्याच्या सर्व चीजवस्तु, मौल्यवान वस्तु किंवा पैसे त्या व्यक्तीला ज्या आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत हलवण्यात आले असेल त्याच्या अधीक्षकाकडे, त्या वस्तूंचा संपूर्ण व योग्य (वर्णनाचे) तपशीलाचे आणि त्यांच्या अंदाजित मूल्याचे विवरणपत्र सोबत पाठविण्यात येतील.

(३) मुख्य निरीक्षक, असे केंद्र किंवा संस्था यांच्या बाबतीत राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही कराराच्या शर्तींचे उल्लंघन करून, राज्य शासनाद्वारे चालविण्यात न येणाऱ्या कोणत्याही आदान केंद्रात किंवा प्रमाणित संस्थेत कोणत्याही व्यक्तीला हलविण्याचा निदेश देणार नाही.

२५. **लायसनवर सुटका करणे.**—(१) एखाद्या प्रमाणित संस्थेमध्ये स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तीला, अशा व्यक्तीचे वर्तन चांगले आहे आणि ती भीक मागण्याचा संभव नाही किंवा इतर व्यक्तींना भीक मागण्यासाठीच्या कामावर लावणार नाही किंवा भीक मागण्यासाठी त्यांचा वापर करणार नाही आणि ती स्वत:चा व स्वत:वर अवलंबून असलेल्या व्यक्तींचा सचोटीच्या प्रामाणिक मार्गांनी चरितार्थ चालवू शकेल असे मुख्य निरीक्षकाचे मत असेल आणि ती पुढील शर्तींची पूर्तता करीत असेल तर तो, अशा व्यक्तीची लायसनवर सशर्त सुटका करू शकेल.

(क) तिला प्रथमच स्थानबद्ध करण्यात आले असेल आणि तिच्या स्थानबद्धतेच्या कालावधीच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतका काळ ती प्रमाणित संस्थेत राहिली असेल ; आणि अन्य कोणत्याही प्रकरणी, स्थानबद्धतेच्या कालावधीच्या दोन तृतीयांशापेक्षा कमी नसेल इतका काळ तो प्रमाणित संस्थेत राहिलो असेल ;

(ख) पहिल्यांदा स्थानबद्धता झाली असल्यास सुटकेच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या एका महिन्यामध्ये, दुसऱ्यांदा स्थानबद्धता झाली असल्यास सुटकेच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या तीन

महिन्यांमध्ये आणि त्यापेक्षा अधिक वेळ झालेल्या स्थानबद्धतेच्या बाबतीत, सुटकेच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या सहा महिन्यांमध्ये नियम २९ च्या खंड (तीन) ते (सात) अन्वये तिला शिस्तभंगासाठी कोणतीही शिक्षा झाली नसेल :

परंतु, मुख्य निरीक्षकास विशेष प्रकरणी कारणे लेखी नमूद करून खंड (क) व (ख) च्या तरतुदी शिथिल करता येतील.

(२) अधीक्षक, प्रमाणित संस्थेमधून सहनिवासी व्यक्तीच्या सुटकेची संभाव्य तारीख त्याच्या नातलगांना वेळेवर कळवील आणि नातलगांना त्या सहनिवासी व्यक्तीचा ताबा घेण्यासाठी त्या तारखेस संस्थेमध्ये येण्यास सांगेल, त्यानुसार नातलग व्यक्ती त्या सहनिवासी व्यक्तीचा ताबा घेतला तर अधीक्षक अशा नातलग व्यक्तीस येण्या-जाण्याच्या प्रवासाचा आणि त्या सहनिवासी व्यक्तीच्या परतीच्या प्रवासासाठी होणारा प्रत्यक्ष खर्च, सहनिवासी व्यक्तीच्या सुटकेच्या वेळी नातलग व्यक्तीस देईल. नातलग व्यक्ती त्या सहनिवासी व्यक्तीचा ताबा घेण्यास न आल्यास त्या सहनिवासी व्यक्तीस तिच्या मूळ गावी संस्थेच्या सुरक्षा रक्षकाबरोबर पाठविण्यात येईल.

२६. **आदान केंद्र व प्रमाणित संस्था येथील दिनक्रम.**—(१) प्रत्येक आदान केंद्रातील किंवा प्रमाणित संस्थेतील सहनिवासी व्यक्तींना पहाटे त्यांची आन्हीके आटोपण्यासाठी बाहेर सोडले जाईल आणि त्यांचे प्रातर्विधी आटोपण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ दिला जाईल.

(२) सहनिवासी व्यक्तींना प्रथम आदान केंद्राची व प्रमाणित संस्थेची शयनशाला (डॉर्मिटरीज), आवार व इतर भागांची साफसफाई करण्याच्या कामावर लावण्यात येईल, त्यानंतर त्या सहनिवासी व्यक्ती सुतार काम, विणाईचे काम व त्यांना नेमून देण्यात आलेल्या इतर कामांवर जातील.

(३) सर्व सहनिवासी व्यक्तींना ते जर वैद्यकीय दृष्ट्या पात्र असतील तर, सर्वसाधारणपणे प्रत्येक कामाच्या दिवशी ८ तास काम करणे आवश्यक असेल. वैद्यकीय अधिकाऱ्याच्या शिफारशीवरून अधीक्षक काम करण्यातून सूट देऊ शकेल किंवा कामाच्या तासांमध्ये कपात करू शकेल.

(४) सहनिवासी व्यक्तींची दिवसभरातील दिनचर्या व त्यांचे काम याविषयीचा तपशील अधीक्षक, मुख्य निरीक्षकाच्या मान्यतेने निश्चित करील. मुख्य निरीक्षकास, आवश्यक असल्यास, वेळोवेळी त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार असेल. याबाबतीतील मान्यताप्राप्त वेळापत्रक आदान केंद्राच्या व प्रमाणित संस्थेच्या सूचना फलकावर लावण्यात येईल.

२७. **श्रेणी पद्धत व उपदाने.**—(१) चांगल्या वर्तणुकीस आणि दिलेल्या प्रशिक्षणाचा वापर केला जाण्यास उत्तेजन देण्याच्या हेतूने, प्रमाणित संस्थेमध्ये किंवा यथास्थिति आदान केंद्रामध्ये पुढील श्रेणी पद्धतीचा अवलंब करता येईल :—

(क) **प्रमुख मुकादम श्रेणी.**—१० मुकादमांमधून विशेषत: चांगली वर्तणूक असलेल्या एका व्यक्तीला प्रमुख मुकादम म्हणून बढती देण्यात येईल.

(ख) **मुकादम श्रेणी.**—२० सहनिवासी व्यक्तींचा समावेश असलेल्या प्रत्येक कार्य गटाच्या प्रमुखस्थानी, जे संस्थेच्या दैनंदिन जीवनात स्थिरस्थावर झाले आहेत आणि ज्यांची वर्तणूक आणि प्रगती समाधानकारक आहे अशा सहनिवासी व्यक्तींमधून निवडलेला एक मुकादम असेल.

(२) श्रेणी वाढीची किंवा श्रेणी कपातीची कार्यवाही अधीक्षकाकडून करण्यात येईल.

(३) देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात ज्याची प्रगती समाधानकारक असल्याचे दिसून येईल किंवा ज्याची वर्तणूक चांगली असल्याचे दिसून येईल अशा सहनिवासी व्यक्तीला दर महिन्याला पाचशे रुपयांहून अधिक नसेल इतके उपदान देण्यात येईल.

(४) सहनिवासी व्यक्तींनी उपदानाच्या स्वरुपात अर्जित केलेली रक्कम अधीक्षकाकडे ठेवण्यात येईल. अधीक्षक जवळच्या शासकीय कोषागारात, नियम १७ च्या पोट-नियम (४) च्या खंड (ख) च्या तरतुदीद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे प्रत्येक केंद्राचे (सहनिवासी व्यक्तीचे) एक वैयक्तिक खाते उघडून त्यात तिची एकूण रक्कम जमा करील. सहनिवासी व्यक्तीला तिच्या खाती जमा असलेली अशी शिल्लक रक्कम अधीक्षकाला योग्य वाटेल अशा वस्तूंवर खर्च करता येईल. सहनिवासी व्यक्तीची सुटका झाल्यावर, तिच्या खात्यात रक्कम शिल्लक असल्यास, ती तिच्या हवाली करण्यात येईल आणि तिचे खाते बंद करण्यात येईल.

२८. **सुटकेपूर्वी मरण पावणाऱ्या किंवा पळून जाणाऱ्या सहनिवासी व्यक्तीच्या मालमत्तेची विल्हेवाट लावणे.**—(१) कोणत्याही प्रमाणित संस्थेतील किंवा आदान केंद्रातील एखादी सहनिवासी व्यक्ती तेथे असताना मरण पावली असेल तेव्हा, त्या मृत व्यक्तीने मागे सोडलेली मालमत्ता आणि उपदान म्हणून कोणतीही रक्कम अर्जित असल्यास अशी रक्कम, सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यात येईल आणि अशा आदान केंद्राच्या किंवा यथास्थिति, अशा प्रमाणित संस्थेच्या अधीक्षकाकडून त्यावर जो आपला दावा सिद्ध करील आणि एक प्रतिभूती बंधपत्र निष्पादित करून देईल, अशा कोणत्याही व्यक्तीच्या हवाली करण्यात येईल. अशी मालमत्ता व रक्कम मिळाल्याबद्दल अशा व्यक्तीकडून एक पावती घेण्यात येईल. अशा सहनिवासी व्यक्तीच्या मृत्युच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीतअसा कोणताही दावेदार आला नसेल तर, ती मालमत्ता व रक्कम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ याची कलमे ८२ ते ८८ च्या तरतुदीनुसार विल्हेवाट लावण्यासाठी पोलीसांच्या हवाली करण्यात येईल.

(२) कोणत्याही आदान केंद्रातील किंवा प्रमाणित संस्थेतील एखादी सहनिवासी व्यक्ती तेथून पळून गेली असेल किंवा तिला अनुपस्थित राहण्यास परवानगी दिलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर, तिने तेथे परत येण्यात कसूर केली असेल तेव्हा, तिने मागे सोडलेली मालमत्ता व उपदान म्हणून कोणतीही असल्यास, अर्जित केलेली रक्कम, अशी सहनिवासी व्यक्ती पळून गेल्याच्या दिनांकापासून किंवा यथास्थिति, अशी सहनिवासी व्यक्तीने ज्या दिनांकास त्या जागी परत यावयाचे होते त्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीसाठी अशा आदान केंद्राच्या किंवा अशा प्रमाणित संस्थेच्या अधीक्षकाकडून सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यात येईल. उक्त कालावधीच्या आत अशा

सहनिवासी व्यक्तीला अटक करून आदान केंद्राकडे किंवा यथास्थिति, प्रमाणित संस्थेकडे परत पाठविण्यात आले नसेल, किंवा तेथे ती परत आली नसेल तर, अशी मालमत्ता व रक्कम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ याची कलमे ८२ ते ८८ यांच्या तरतुदीनुसार विल्हेवाट लावण्यासाठी पोलिसांच्या हवाली करण्यात येईल.

२९. **शास्ती.**—एखाद्या व्यक्तीने, नियम १५ च्या कोणत्याही तरतुदीच्या भंग/उल्लंघन केल्यास ती अधीक्षकाकडून देण्यात येईल अशी पुढील कोणत्याही एका किंवा अधिक शिक्षेस पात्र असेल. अधीक्षक, त्या प्रयोजनार्थ पुरविलेल्या एका नोंदवहीत अशा शिस्तविषयक सर्व उपाययोजनांची नोंद घेईल :—

(एक) अधीक्षकाने सहनिवासी व्यक्तीला उद्देशून व्यक्तीशः औपचारिक ताकीद देणे ;

(दोन) विशेषाधिकारांचे कोणतेही असल्यास, समपहरण करणे ;

(तीन) श्रेणी कपात करणे, कोणतीही असल्यास ;

(चार) तीन दिवसांहून अधिक नाही इतक्या कालावधीसाठी कच्च्या कैदेत स्थानबद्ध करणे ;

(पाच) स्त्री असेल त्याखेरीज, बेड्या घालणे ;

(सहा) एका वेळी १० दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी एकांत बंदीवासात ठेवणे :

परंतु, खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा, खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षेखेरीज अन्य कोणत्याही शिक्षेबरोबर एकत्रितरीत्या ठोठावण्यात येणार नाही, आणि खंड (चार) आणि (सहा) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा, विभिन्न वेळी व विभिन्न अपराधांसाठी दिलेल्या असल्या तरीसुद्धा एकत्रितरीत्या भोगाव्या लागणार नाहीत.

३०. **लायसनवर सुटका करण्याबद्दलच्या शर्ती.**—प्रमाणित संस्थेत स्थानबद्ध केलेल्या एखाद्या व्यक्तीस, नमुना 'ड' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीवर असेल त्याखेरीज, कलमं २२ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये मुख्य निरीक्षकाकडून लायसनवर सोडण्यात येणार नाही.

३१. **निरसन व व्यावृत्ती.**—(१) या नियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेले मुंबई भिकाऱ्यांबाबतचे नियम, १९६४ आणि त्यास तत्सम असलेले इतर सर्व नियम, या नियमाचा प्रारंभ झाल्यावर निरसित होतील :

परंतु, अशारीतीने निरसित केलेल्या उक्त कोणत्याही नियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा करण्यात आलेली कोणतीही कार्यवाही, जर अशी गोष्ट किंवा कार्यवाही या नियमांच्या कोणत्याही तरतुदीशी विसंगत नसेल तर, या नियमांच्या तत्सम तरतुदीन्वये केली असल्याचे किंवा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

नमुना ' अ '

(नियम ३ पहा)

नाव ........................................................................................................ क्रमांक
........................................................

पत्ता ........................................................................................................ यास, दिनांक ..............................
रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक ........................................................ रोजी संपणाऱ्या कालावधीत
पुढील क्षेत्रांतर्गत ........................................ पुढील ठिकाणी ........................................ , .............................. या
प्रयोजनार्थ पैसे अन्न/देणग्या मागण्यासाठी किंवा स्वीकारण्यासाठी पुढील शर्तीस अधीन राहून, प्राधिकृत करण्यात येत आहे :—

(एक) धारक आपदग्रस्तासाठी मदत मागेल त्यावेळी हे प्राधिकारपत्र सोबत बाळगील आणि ते, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने मागितल्यावर, तपासणीसाठी सादर करील.

(दोन) हे प्राधिकारपत्र अहस्तांतरणीय असेल.

(तीन) गोळा केलेली आपदग्रस्तासाठी मदत (पैसा इत्यादी रक्कम) ही केवळ वर नमूद केलेल्या प्रयोजनासाठीच वापरण्यात येईल.

(चार) आपदग्रस्तासाठी मदत (पैसा इत्यादी) गोळा करण्याची पद्धती पुढीलप्रमाणे असेल :—

(प्राधिकारपत्र देणाऱ्या प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट करावयाचे)

(पाच) हे प्राधिकारपत्र त्याच्या कोणत्याही शर्तीचा भंग झाला तर, रद्द केले जाण्यास पात्र असेल.

दिनांक .............................. २० .............. रोजी माझी सही व शिक्क्यानिशी देण्यात आले.

________________

पोलीस आयुक्त, मुंबई
जिल्हा दंडाधिकारी.

(अधिसूचना क्र. अतासु. २००६/प्रक्र.७७/का-८, दिनांक ३० डिसेंबर २००६ अन्वये " भीक " या शब्दाऐवजी " आपदग्रस्तासाठी मदत " असे शब्द घातले.)

नमुना ' ब '

[नियम ८(२) पहा]

**वैद्यकीय चाचणी चिठ्ठी स्वीकारणारे केंद्र**

नाव (पूर्ण)............................................................................................ वय
................ क्रमांक ................

स्थानबद्ध केले. लिंग ................ वजन ............ उंची .......... ओळख चिन्हे ................................
........................................ आरोग्य विषयक सर्वसाधारण स्थिती ................................................
.................... संस्थेत .............................................................................. काम करण्यास पात्र.

अभिप्राय ..................................................................................................................

दिनांक : ....................................

वैद्यकीय अधिकारी.

नमुना 'क'

[नियम ८ (२) पहा]

**वैद्यकीय चाचणीचा नमुना**

आदान केंद्राचे नाव ........................................

प्रवेश क्रमांक ........................................

(क) पूर्ण नाव ........................................
विवाहित/अविवाहित ........................ जात ........................ वय ............ लिंग ............
ओळख चिन्ह ........................................ आदान केंद्रात दाखल
करून घेतल्याचा दिनांक ........................ वजन ............ उंची ............ आरोग्य-
विषयक सर्वसाधारण स्थिती, शारीरिक स्थिती व पूर्व इतिहास ........................................
........................................

तो/ती कोणत्या प्रकारच्या कामासाठी, कोणतेही असल्यास, पात्र आहे ........................................
........................................

(ख) वैद्यकीय चाचणीचा निष्कर्ष :—

(१) डोळा

(२) तोंड

(३) दात

(४) नाक

(५) घसा

(७) कान

(८) फुफ्फुसे

(९) यकृत

(१०) प्लीहा

(११) त्वचा

(१२) रक्ताची चाचणी, कोणतीही असल्यास

(१३) मनोवृत्ती

(१४) लघवी तपासणी, कोणताही असल्यास.

(१५) व्यंग, कोणतेही असल्यास,

(१६) सांसर्गिक किंवा संक्रमक रोगांबाबत किंवा चेता संस्थेबाबतच्या आजारांबरोबरच इतर आजारांबरील, कोणतेही असल्यास विशेष अभिप्राय,

(१७) जखमा किंवा हिंसाचाराच्या खुणा, कोणत्याही असल्यास.

रोग निदान—

(१) सांसर्गिक कुष्ठरोग किंवा इतर संसर्गजन्य पसरणारा संक्रमक रोग झाला आहे किंवा कसे ?

(२) वेडसर आहे किंवा कसे ?

(३) इतर रोग, कोणतेही असल्यास.

प्रस्तावित उपचार किंवा कार्यवाहीबद्दलचे अभिप्राय.

वैद्यकीय अधिकारी.

नमुना ' ड '

(नियम ३० पहा)

**लायसनवर सुटका करण्याबाबतचा नमुना**

मी, ................................................., मुख्य निरीक्षक, प्रमाणित संस्था, महाराष्ट्र राज्य, या लायसनद्वारे, श्री. * ....................................................................................... जात ............................... राहणार ....................................... क्रमांक ........................... ज्यास ............... येथील न्यायालयाने, मुंबईचा भीक मागण्यास प्रतीबंध करण्याबाबतचा अधिनियम, १९५९ (१९६० चा मुंबई २०) याच्या कलम .......................... अन्वये दिनांक ............... २० .......... रोजी .......... मुदतीकरिता प्रमाणित संस्थेत स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले होते आणि ज्यास आता, ............ येथील @........................ मध्ये स्थानबद्ध करण्यात आले आहे, याची पूर्वोक्त स्थानबद्धतेच्या उर्वरित भागासाठी उक्त संस्थेतून सुटका करण्याची परवानगी देत आहे.

हे लायसन त्यावर पृष्ठांकित केलेल्या शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे. त्यापैकी कोणत्याही शर्तीचा भंग केला तर, लायसन रद्द केले जाण्यास पात्र असेल.

माझ्या सही व शिक्क्यानं दिनांक ........................... २० ............ रोजी दिले.

मुख्य निरीक्षक
मध्यवर्ती संस्था, महाराष्ट्र राज्य,
पुणे.

(* येथे कैद्याचे सहनिवासी व्यक्तीचे नाव नमूद करावे)

(@ येथे प्रमाणित संस्थेचे नाव नमूद करावे)

**शर्ती**

१. लायसनधारक ............ येथे जाईल आणि .................. तेथे राहील, आणि त्यास जर त्याची /तिची विनाशर्त सुटका करण्यात आली नसेल किंवा लायसन अगोदर रद्द केले नसेल तर, त्याचा /तिचा स्थानबद्धतेचा कालावधी समाप्त होईपर्यंत मुख्य निरीक्षकाच्या संमतीने, कोणत्याही ठिकाणी राहता येईल.

२. लायसनधारक त्याच्या/तिच्या सुटकेच्या दिनांकापासून एका महिन्याच्या कालावधीच्या आत नियमित रोजगार मिळवील आणि ते रोजगाराच्या ठिकाणी किंवा अन्यथा, वक्तशीर उपस्थिती संबंधात त्याला/तिला मुख्य निरीक्षकाकडून देण्यात येतील अशा सूचनांचे पालन करील.

३. लायसनधारक, भीक मागण्यापासून स्वत:ला दूर ठेवील किंवा भीक मागण्यास व्यक्तींना नेमणार नाही किंवा त्यांना भीक मागावयास लावणार नाही किंवा भीक मागण्याच्या प्रयोजनासाठी त्यांचा उपयोग करून घेणार नाही.

४. लायसनधारक, मुख्य निरीक्षकाचे समाधान होईल असे नेमस्त/नेकीचे आणि उद्योगी जीवन जगेल.

५. लायसनधारक, पर्यवेक्षण करणाऱ्या परिवीक्षा अधिकाऱ्याच्या सूचनांचे पालन करील.

६. वरील कोणत्याही शर्तीचा त्याने/तिने भंग केल्यास, लायसन रद्द करण्यात येईल आणि त्यानंतर, लायसनधारक, ज्या मुदतीसाठी न्यायालयाने त्याला/तिला स्थानबद्ध करण्याचे आदेश दिलेले होते ती मुदत समाप्त होईपर्यंत एखाद्या प्रमाणित संस्थेत स्थानबद्ध केला/केली जाण्यास पात्र असेल.

७. मुख्य निरीक्षक हा, या लायसनच्या कोणत्याही शर्तीचा भंग करण्यात आला किंवा कसे हे ठरविण्यासाठी एकमेव न्यायधीश असेल.

मी, याद्वारे असे कबूल करतो की, मला वाचून/समजावून दाखविण्यात आलेल्या/सांगितलेल्या वरील शर्तींची मला पूर्णपणे जाणीव असून त्या मला मान्य आहेत.

लायसनधारकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

प्रमाणित करण्यात येते की, वर विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती (नाव) ........................................ ........................................ यास/हीस वाचून दाखविल्या/समजावून सांगितल्या आहेत आणि त्या, लायसनधारकाने मान्य केल्या आहेत आणि त्यानुसार दिनांक .................... २० .......... रोजी त्याची/तिची सुटका करण्यात आली आहे.

अधीक्षकाची सही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई